بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ


**Office Of The sadar Majlis Ansarullah Bharat**

**دفتر صدر مجلس انصاراللہ بھارت**

Ph: +91-01872-220186, Fax : +91-01872-224186, Mob. +91-94170-20616, E-Mail : ansarullahbharat@gmail.com


सारांश व्याख्यान शुक्रवार सय्यदना हजरत अकदस अमिरूल मोमीनीन मसीह चे पंचम खलीफा यांनी कथन केलेले दिनांक २५ सप्टेंबर २०१५, मुक़ाम मस्जिद बैतुल फतूह, लंडन

**सत्कर्म आणि उपासनेमध्ये उत्साह आपल्याकडून होऊ शकत नाही. हे अल्लाहची कृपा आणि वरदानाने प्राप्त होते. यासाठी गरज आहे की मनुष्य घाबरता नये आणि अल्लाकडून त्याची कृपा आणि वरदान प्राप्त करण्यासाठी प्रार्थना करत रहावे. हे उत्साह निर्माण करण्यासाठी क्षमायाचना मागण्याची गरज आहे. सैतानाच्या हल्यांपासून वाचण्यासाठी क्षमायाचना मागणे फार आवश्यक आहे.**

तशहुद, तअव्वुज आणि सूरः फातिहा च्या तिलावत नंतर हुजूर–ए–अन्वर अय्यदल्लाहु तआला बिनसरहिल अजीज यांनी सांगितले –

काही लोक प्रश्न करतात की उपासनेमध्ये उत्साह कशाप्रकारे उत्पन्न होतो. आम्ही प्रयत्न करून सुध्दा ही कैफीयत उत्पन्न होत नाही. तेव्हा लक्षात ठेवले पाहिजे की भक्ताचे कार्य हे आहे की संपूर्णपणे प्रयत्न करत राहीले पाहिजे. या आस्थेवर कायम राहिले पाहिजे की जे काही प्राप्त व्हायचे आहे ते सर्व अल्लाहकडून प्राप्त होणार आहे. तेव्हाच ही कैफियत निर्माण होईल. जी अल्लाह च्या जवळ नेते आणि नंतर उपासनेच्या उत्साहाला वाढवते.

एकदा हजरत मसीह मौऊद अलैहिस्सलाम यांनासुध्दा कोणीतरी विचारले उपासनेत उत्साह कसा निर्माण होतो. त्यांनी सांगितले की सत्कर्म आणि उपासनेमध्ये उत्साह आपणहुन कधीच निर्माण होत नाही. स्वतः मनुष्य सांगेल की माझ्यामध्ये निर्माण होईल मी स्वतःच्या प्रयत्नाने निर्माण करणार . हे शक्य नाही. हे अल्लाहच्या कृपेने आणि वरदानाने प्राप्त होते. यासाठी आवश्यक आहे की मनुष्याने न घाबरता आणि अल्लाहकडे त्याची कृपा आणि वरदान प्राप्त करण्यासाठी प्रार्थना करत राहिले पाहिजे. थकून बसता नये तसेच संपूर्णतः प्रार्थना करण्यात मग्न राहिल्यानंतर शेवटी अल्लाह आपल्या कृपेने ती गोष्ट उत्पन्न करतो जिच्यासाठी त्याच्या मनात तळमळ आणि अस्वस्थता असते म्हणजेच उपासनेसाठी एक उत्साह आणि आवड निर्माण होते. उपासनेचे जसे म्हणतात एक गोडी निर्माण व्हायला लागते. एक मजा वाटायला लागते. सांगितले की परंतु जर कोणी व्यक्ती स्वतः स्वरूप आणि प्रयत्न नाही करत आणि तो समजेल की फुक मारल्यावर उपासक बनवेल असे होवू शकत नाही. सांगितले की हे अल्लाह चे कायदे कानून नाही आहेत. या पध्दतीने जो कोणी अल्लाहला आजमावतो तो स्वतः अल्लाहची थट्टामस्करी करतो आणि शेवटी मारला जातो. शेवटी परीणाम काय होतो. मारला जातो, अल्लाहपासून लांब होतो. सांगितले की निट लक्षात ठेवा की मन अल्लाहच्या हाती आहे. त्याची कृपादृष्टी नसेल तर दुसऱ्या दिवशी जाऊन ख्रिश्चन व्हा. इस्लाम मधून दूर व्हा किंवा नास्तिकतेत गर्क व्हा. श्रध्देपासून दूर जाल. यासाठी प्रत्येक वेळी त्याच्या कृपेसाठी प्रार्थना करत रहा आणि त्याचेच सहकार्य मागा आणि त्याच्याजवळ मदत मागा की सरळ मार्गावर तुम्हाला कायम ठेवू दे. जो व्यक्ती अल्लाह शी गाफील होतो तो सैतान होतो. जिथे अल्लाहशी गाफील झालात अल्लाह ला सोडलात, अल्लाहला विसरलात तिथूनच सैतानाने हल्ले केले आणि सैतान झाले.

सांगितले की यासाठी आवश्यक आहे की मनुष्याने नेहमी क्षमायाचना करत राहिले पाहिजे कारण तो विष आणि उत्साह निर्माण होवू नये जो मनुष्याला नष्ट करतो. क्षमायाचना त्याच्यावर निदान आहे. की क्षमायाचना करा कारण त्या विषापासून वाचाल जे सैतानाच्या जवळ नेतो आणि मनुष्याला नष्ट करतो.

तथापि सुस्वभाव ही शर्त आहे आणि ही आस्था की अल्लाह व्यतिरिक्त आणखिन कोणी नाही. जेव्हा सर्व मार्ग बंद करून अल्लाह जवळ मनुष्य नतमस्तक होईल तेव्हाच ती कैफियत निर्माण होते आणि उपासनेमध्ये आवड सुध्दा निर्माण करते. संपूर्णपणे अल्लाह समोर नतमस्तक व्हावे लागते. पुनःपुन्हा त्याच्याजवळ मदत मागावी लागते. सैतान कारण प्रत्येक वेळी हल्यासाठी तयार आहे त्यासाठी हजरत मसीह मौऊद अलैहिस्सलाम यांनी सांगितले की हा उत्साह आणि आवड उत्पन्न करण्यासाठी क्षमायाचना करणेसुध्दा आवश्यक आहे. सैतानच्या हल्यापासून वाचण्यासाठी क्षमायाचना करणे खुप आवश्यक आहे. क्षमा मागुन ज्यावेळी सैतानाला आपल्यापासून दूर पळवतील तेव्हाच मनुष्य अल्लाहच्या शरण मध्ये येण्यासाठी तळमळीने प्रार्थना सुध्दा करेल. क्षमायाचना सुध्दा त्या तळमळीने होत असेल आणि अजून जास्त सफलतेसाठी त्याच्या जवळीकतेचे मार्ग शोधण्याची प्रार्थना सुध्दा होत असेल. मग जेव्हा अशी अवस्था मनुष्याची होईल ही कैफियत ओढवेल तेव्हाच अल्लाह त्याच्यावर आपली कृपा करेल.

अल्लाह आमच्यावर सच्चा उपासक आणि पुण्यकर्म करण्याची कृपा करू दे आणि सुस्वभावाने त्यावर कायम राहण्याची कृपा करू दे.

Khulasa Khutba Jumma Huzoor Anwar 25th September 2015

*BOOK-POST (PRINTED MATTER)*

*TO,.................................................................*

*.................................................................*

From; *Office Ansarullah Bharat, Aiwan-e-Ansar, Moh; Ahmadiyya,Qadian-143516Via; Batala, Dist; Gurdaspur (Pb)*